# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** दिग्रस
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0181 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**11/03/2025 21:39

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 11/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/03/2025 **Time (वेळ):** 21:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2025 21:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 00.05 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** विसावा कक्ष पो स्टे दिग्रस , दिग्रस ,दिग्रस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.माधव गुलाब राठोड
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरदळी, ता दिग्रस,दिग्रस,दिग्रस,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरदळी, ता दिग्रस,दिग्रस,दिग्रस,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9850562925

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. नारायण धोंडोबाजी लोंढे | | | 1. विराट नगर, दिग्रस,,दिग्रस,, दिग्रस,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. दिलीप प्रल्हाद राठोड | | | 1. बालाजी पार्क पुसद, ता पुसद, , पुसद,पुसद शहर,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रार प्राप्त होताच दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांकः 11/03/2025 फिर्याद माझे नांव:- श्री.माधव गुलाब राठोड, वय 55 वर्ष, धंदा शेती, रा. वरंदळी, ता. दिग्रस, जि.यवतमाळ मो.क्र. 9850562925

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन शेती करतो, मी दिनांक 24/02/2025 रोजी मी बाहेगावावरुन माझे गावाकडे येत असतांना माझ्या गावातील काही लोक विठाळाचे वरंदळी गावातील रस्त्यावर मला जमलेले दिसले, तेथे विटाळा गावातील मुलीची छेड आमच्या गावातील तरुणानी काढली यावरुन वाद सुरु होता. मी त्यात मध्यस्ती करुन तो वाद मिटविला होता. त्यावेळी छेड काढणाऱ्या मुलाला कानाखाली मारल्यावरुन माझ्या विरुध्द दिग्रस पोलीस ठाण्यात एन.सी. नोंद करण्यात आली आहे. त्यावरुन दिनांक 07/03/2025 रोजी मला पिएसआय श्री. नारायण लोंढे यांनी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. तेव्हा मी पोलीस ठाणेस गेलो होतो. त्यावेळी पिएसआय लोंढे म्हणाले की, तुमच्या विरुध्द एन.सी.दाखल झाली आहे. तुम्ही नेहमी आम्हाला सहकार्य करता म्हणुन आम्ही 5,000/- रुपयामध्ये हेराफेरी करुन टाकु असे म्हणुन 5,000/- रुपये घेवुन सोमवारी किंवा मंगळवारी या असे मला बोलले होते.

मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी शनिवार दिनांक 08/03/2025 रोजी श्री. नामवाडे सा., अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ यांचेशी संपर्क करून वरील माहिती देवून दिनांक 10/03/2025 रोजी कार्यवाही करण्याचे ठरले होते. परंतु, दिनांक 10/03/2025 रोजी माझ्या चुलत बहीणीचे निधन झाल्यामुळे मी पुन्हा श्री. नामवाडे साहेब यांचेशी संपर्क करून माझ्या चुलत बहीणीचे निधन झाल्यामुळे मला दिनांक 10/03/2025 रोजी तक्रार देणे शक्य नसुन आपण दिनांक 11/03/2025 रोजी माझी तक्रार घेण्याकरीता या असे कळविले होते. त्यावरुन आज दिनांक 11/03/2025 रोजी माझी तक्रार घेण्याकरीता अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ चे अधिकारी व स्टाफ हे पंचासह दिग्रस शहराबाहेर चिरकुटा धरणाजवळ आले असता अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ येथील पोलीस निरीक्षक, श्री. मनोज ओरके यांनी त्यांचे सोबत आणलेल्या दोन शासकीय पंचांची, माझी व त्यांची स्वतःची ओळख करून दिली व मी त्यांना संबधीत लाच मागणारे पिएसआय श्री. नारायण लोंढे यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी माझी लेखी तक्रार दिली.

यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. ओरके यांना पंचासमक्ष सांगीतले की, "श्री. लोंढे हे पोलीस स्टेशनला असतील त्यामुळे आज दिनांक 11/03/2025 रोजी माझे तक्रारीची पडताळणी करण्यात यावी," अशी विनंती केल्याने, माझे तक्रारीची पडताळणी आज दिनांक 11/03/2025 रोजी करण्याचे ठरले होते.

पडताळणी पुर्व पंचनामा दिनांक 11/03/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, यवतमाळ कॅम्प दिग्रस येथे करण्यात आला. मी दिलेल्या तक्रारी वरून पंच यांचेसमक्ष लाचमागणी पडताळणी कार्यवाही केली असता पडताळणी दरम्यान पिएसआय श्री. नारायण लोंढे यांनी माझेकडे तडजोडी अंती 2,000/-रु. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले होते व सदरची लाच रक्कम घेवुन या, असे त्यांनी मला सांगितल्याने मी त्यांना होकार दिल्याने आजच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यावरून आज दि. 11/03/2025 रोजी मी 500/- रुपये दराच्या 04 नोटा असे एकुण 2,000/-रु. जमवुन पोलीस निरीक्षक श्री. ओरके यांचेकडे सापळा कार्यवाही करीता हजर केले असता नोटांच्या क्रमांकाचे टिपण तयार करून पोकाँ पाटील यांनी सदर नोटांना मी, पंच व पोलीस स्टॉफ यांचे समक्ष अँन्थ्रासीन पावडर लावली व पोलीस स्टेशन दिग्रस येथील विसावा कक्षा मध्ये सापळा कार्यवाही आजमावली असता सदर सापळा कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र.1 श्री. सचिन नागरगोजे यांचेसह पिएसआय लोंढे, पोलीस स्टेशन दिग्रस यांची भेट घेतली असता त्यांनी

माझे जवळील 2,000/- रु. लाच रक्कम स्विकारून त्यांनी त्यांचे टेबलवर ठेवले व पोहवा राठोड यांना ठेव असले बालेले असता पोहवा राठोड यांनी सदर रक्कम टेबलवरून उचलुन टेबलच्या ड्रॉव्हरचे वर ठेवली. त्यावेळी पंच क्रमांक 1 श्री. सचिन नागरगोजे हे माझेसोबत होते. ते घडलेली सर्व घटना पाहात व ऐकत होते. त्यानंतर मी विसावा कक्षाचे बाहेर येवुन सापळा लावलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा डाव्या हाताने केसावर हात फिरवून नियोजीत इशारा दिला असता अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ चे अधिकारी व अमंलदार यांनी पिएसआय लोंढे व पोहवा राठोड यांना ताब्यात घेवुन दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक यांनी त्यांच्या टेबलच्या ड्रॉव्हरचे वर ठेवलेल्या 500/- रुपये दराच्या 04 नोटा असे एकुण 2,000/- रु. लाच रक्कम ताब्यात घेवून जप्त करून पुढील कार्यवाही केली.

एकंदरीत दि. 11/03/2025 रोजी 12/55 वा. ते 14/15 वा. दरम्यान पिएसआय लोंढे यांनी माझे विरुध्द दाखल एन.सी. मध्ये कारवाई न करण्यासाठी स्वतःकरीता पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडी अंती 2,000/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान श्री. नारायण धोंडोबाजी लोंढे, पोउपनि यांनी पोस्टे दिग्रस, जि. यवतमाळ यांनी सदर रक्कम पोलीस स्टेशन दिग्रस येथे असलेल्या विसावा कक्षामध्ये माझे कडुन लाच रक्कम 2,000/- रु. स्विकारून पोहवा राठोड यांना ठेव असे बोलुन पोहवा राठोड यांचे समोर टेबलवर ठेवले असता पोहवा राठोड यांनी सदर रक्कम टेबलवरून उचलुन टेबलच्या ड्रॉव्हरचे वर ठेवली. माझी श्री. नारायण धोंडोबाजी लोंढे, पोउपनि, रा. विराट नगर, दिग्रस, ता. दिग्रस, जिल्हा यवतमाळ व श्री. दिलीप प्रल्हाद राठोड, ब.नं. 1748, पोलीस हवालदार, नेमणुक पोस्टे दिग्रस, जि. यवतमाळ, रा. बालाजी पार्क, ता. पुसद, जिल्हा यवतमाळ यांचेविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही होणेकरीता माझी फिर्याद आहे.

माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहिली ती घडलेल्या घटनेनुसार बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SEVANAND WAMANRAO WANKHADE(I (Inspector)) / COBN6530 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SEVANAND WAMANI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): COBN6530

HC/324
ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, दिग्रस